ISSN – 2277-7911
Impact Factor – 5.519

YOUNG RESEARCHER
A Multidisciplinary Peer-Reviewed Refereed Research Journal

December - 2024
Vol. 13
Special Issue
No. 1

# आदिवासी समाजाचे सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक जीवनाचे समाजशास्त्रीय अध्ययन

**स्वप्नाली प्रवीण बिरनाळे**

*सहायक प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग*

*डॉ. डी. वाय. पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आकुर्डी, पुणे - 411044.*

***Corresponding Author:* स्वप्नाली प्रवीण बिरनाळे**

**DOI - 10.5281/zenodo.14566897**

**सारांश** :

*या शोधनिबंधचा मुख्य उद्देश भारतीय समाजातील असणाऱ्या आदिवासी समाजाची सामाजिक तसेच आर्थिक परिस्थिती समजून घेणे. या समाजाची आपली अशी वेगळी ओळख आहे, डोंगर दर्या मध्ये राहणाऱ्या लोकांचा विकास हा विकसित समाजाच्या तुलनेत कश्या प्रकारे आहे. आदिवासी समाजाची असणारी त्यांची वैशिष्ट्य पूर्ण भाषा, चालीरीती, रूढीपरंपरा, यांनी समृद्ध अशी त्यांची संस्कृती आहे त्याला भारतामध्ये वेगवेगळ्या भागामध्ये विभागलेले आहेत. शैक्षणिक आणि आर्थिक दृष्ट्या हा समाज हा अत्यंत मागासलेले आहेत.त्यांची असणारी भौगोलिक सीमा हे आदिवासी समुदायाचे अस्मितेचे मूळ आहे.या समाजाचा विकास हा कश्या प्रकारे आहे त्याची असणारी शिक्षणाची परिस्तिथी व त्यातून त्यांच्या समाजाची असणारी आर्थिक व्यवस्था हे आपणास दिसून येते .विकसित समाजापासून डोंगरदर्या मध्ये राहणारे या समाजाची असणारी कौटुंबिक व्यवस्था त्यांची असणारी विवाह पद्धती नातेदारी पद्धती याची माहिती घेतली तसेच त्यांच्या मध्ये मूलतः असणाऱ्या त्याची संस्कृती हे त्यांनी जपून ठेवली आहे. त्यांचे असणारे वेगळे पण दिसते त्यांच्या मध्ये निसर्ग हेच सर्व काही असल्या मुळे देव व धर्माची त्यांची असणारी श्रद्धा आपणास दिसते .या समाजाचा कौटुंबिक,विवाह पद्धती नातेदारी पद्धत, धर्म मानण्याची संकल्पना तसेच त्यांच्या लेखी शिक्षणाला असणारे महत्व व त्यातून त्याचा होणार आर्थिक विकास याचा निरीक्षण व अभ्यास या संशोधना द्वारे केले आहे जेणेकरून या समाजाचा लक्ष्य वेधून त्याचा विकासाचे प्रयत्न होतील*

***मुख्य शब्द : आदिवासी, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, अर्थव्यवस्था, कौटुंबिक, अंधश्रद्धा, शिक्षणातील गळती***

**प्रस्तावना:**

जगातील सर्वच भागात कमी जास्त प्रमाणात आदिवासी समाज आढळून येतो .विशेषतः आशिया, आफ्रिका व अमेरिका या खंडामध्येआजही मोठ्या प्रमाणात आदिवासी समाज आपणास दिसून येतो. त्याच बरोबर भारतात मोठ्या प्रमाणात आदिवासी समाज आहे भारत देश विविधतेने नटलेला असा हा देश आहे त्या मध्ये

वेगवेगळ्या जातीधर्मानी संपन्न आहेत त्याचबरोबर आपल्याला सगळीकडे विविधतेत एकता हि आपणास दिसते .भारतीय समाजाचे सामाजिक ,आर्थिक आणि भौगोलिक वेगवेगळे पण खूप मोठ्या प्रमाणात दिसते आहे व तो देशातील डोगरदऱ्या मध्ये राहणार हा समाज प्रगत समाजापासून अलिप्त आहे .भारताच्या चौफेर दिशांनी विखुरलेला आहे .आदिवासी समाजाची भारतीय समाजव्यवस्थेतील एक महत्वाचा समाज घटक म्हणजे आदिवासी समज घटक होय. विकासाच्या प्रक्रियेचा अभ्यास करताना समाजाच्या एखाद्या घटकाच्या समस्यांकडे दुर्लक्ष करता येणार नाही. समाजाच्या विकास प्रक्रियेतील आर्थिक व सामाजिक शैक्षणिक व ईतर घटकाचा समस्यांकडे दुर्लक्ष करता येणार नाही. समाजाच्या विकास प्रक्रियेतील आर्थिक व सामाजिक शैक्षणिक व ईतर घटकाचा समस्यांकडे दुर्लक्ष करता येणार नाही. हा समाज मुख्य प्रवाहापासून हा समाज अजून हि अलिप्त आहे आपला असणारा ग्रामीण भाग आणि शहरी भाग यांच्यातील अंतर हे फक्त भौगोलिक नसून एकंदरीत सामाजिक ,आर्थिक आणि सांस्कृतिक आणि मूलतः शैक्षणिक बाबतीत परस्पर भिन्नता खूप मोठी दिसतेभारतीय राज्यघटनेतील तरतुदीनुसार लोकशाही राज्य हे सर्व जनतेचे राज्य आहे. घटनेने सर्वांना समान संधी हक्क आणि अधिकार दिलेले आहेत परंतु इतर समाजाच्या तुलनेत आदिवासी समाज मागासलेला राहिलेला दिसतो. ब्रिटीश राजवटीत आदिवासी विकासाचे प्रयत्न झाले होते. परंतु त्यांच्या या कार्य मागे विकास आणि दयेची भावना होती. धर्म परिवर्तन व समाज विघटन हा हेतू त्या मागे होता. आज मात्र आदिवासी विकास कार्याचा वेग वाढवून त्याच्या दिशा व्यापक करणे अनिवार्य आहे. लोकशाही प्रधान राजवटीमध्ये प्रत्येक घटकाचा सर्वांगीण विकास होणे गरजेचे आहे. लोकशाही प्रधान राजवटीमध्ये प्रत्येक घटकाचा सर्वांगीण विकास होणे गरजेचे आहे व कोणत्याही विकासाच्या प्रक्रियेपासून वंचित राहू नये हि काळाची गरज आहे

**आदिवासी संज्ञेचा अर्थ:**

समाजाचा संपर्क न झालेल्या व आपली वैशिष्ट्य पूर्ण चालीरीती जपणारी संस्कृती आदिवासीमध्ये आढळते. पण जगातील सर्व आदिवासी त्या प्रदेशाचे मूळ रहिवासी आहेत. तसेच हजारो वर्ष झाले तरी परिवर्तन झाले नाहीआदिवासींचे कैवारी ठक्कर बाप्पा व महात्मा गांधी यांनी "मूळ निवासी" आदिवासी ना म्हटले आहे यांनी तर डॉ.घुर्ये यांनी मागासलेले हिंदू ,एलविन यांनी गिरिजन तर भारतीय राज्यघटनेत अनुसूचित जमाती असा उल्लेख आहे. आंद्रे बेताई यांच्यामते ज्या समाजच्या विशिष्ट भूप्रदेशात राहणार समान बोली भाषा, बोलणारा व समान सांस्कृतीक जीवन जगणारा अक्षर ओळख नसलेल्या व्यक्तीच्या संघाला आदिवासी असे म्हणतात. आदिवासी मध्ये अनेक जाती उपजाती यांनी बनलेली आहे. प्रत्येकाची जीवनपद्धती मूल्य, धर्मावरची श्रद्धा आचार, विचार, प्रथा, परंपरा कोणत्या ही समाजाचा

विकास होण्यासाठी त्या ठिकाणची असणारी सामाजिक, आर्थिक परिस्थिती महत्वाची असते. आदिवासी समाजव्यवस्था ही इतर समाजापासून खूप बाबतीत मागासलेली दिसते. त्या समाजव्यवस्तेथ महिलांचा असणारा सहभाग हा सामाजिक आणि आर्थिक बाबतीत खूप मागे असलेले दिसते. कोणत्या ही समाजाचा विकास होण्यासाठी त्या ठिकाणची असणारी सामाजिक,आर्थिक परिस्थिती महत्वाची असते. आदिवासी समाजव्यवस्था ही इतर समाजापासून खूप बाबतीत याउलट निसर्गाशी तादात्म्य पावलेल्या, स्वच्छंदी व स्वतंत्र वृत्तीच्या आणि आधुनिक जगाच्या संपर्कामुळे भ्रष्ट न झालेल्या आदिवासींचे जीवन सुखमय व अनुकरणीय आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे:**

१. आधुनिक जगामध्ये आदिवासी समाजाचा होणारा विकास हा कसा होत आहे ह्याचे अध्ययन करणे.
२. आदिवासी समाजाच्या असणाऱ्या त्यांच्या सामाजिक बाबी जाणून घेऊन त्याचे अध्ययन करणे.
३. आदिवासी समाजाची असणारी कुटुंबपद्धती, विवाह नातेदारी पद्धत त्यांची त्यांच्या धर्माबद्दल असणारी आस्था याचे अध्ययन करणे.
४. आदिवासी समाजाची शैक्षणिक पातळीचे अध्ययन करणे.
५. आदिवासी समाजाचा सांस्कृतिक बाबीचा अध्ययन करणे.

**संशोधनाची पद्धत** :

सदरशोध निबंधात द्वितीयक माहिती स्तोत्राचा उपयोग करण्यात आला आहे. यात ग्रंथालयिन व विश्लेषनात्मक संशोधक पद्धतीचा वापर करण्यात आला आहे .यामध्ये आदिवासीवरील अधिकृत लेखनाची पुस्तके, सामाजिक लेख समस्यशी संबधीत पुस्तके ,या विषयावरती झालेले विविध शोध निबंध व स्वतःचे अनुभव संकलन इ.चा आवश्यकतेनुसार माहिती जाणून घेण्यासाठी उपयोग करण्यात आला आहे .

**आदिवासी समाजाच्या कौटुंबिक व सामाजिक जीवन:**

आदिवासी समाज हा वेगवेगळ्या छोट्या मोठ्या समूहामध्ये विखुरलेला दिसतो .त्याच बरोबर त्यांची असणारी भाषा, संस्कृती, मूल्य, धर्मावरती असणारी श्रद्धा याचे असणारे त्यांचे वेगळेपण व वैशिष्ट्यपूर्ण ओळख त्यांनी जपून ठेवले आहे .विशिष्ट भौगोलिक सीमा हे आदिवासी समुदायाचे अस्मितेचे मूळ आहे .अस्मितेच्या जाणीवेमुळेच आदिवासी जमातींचे अस्तित्व टिकून राहते. प्रत्येक आदिवासी समुदायाचे एक विशिष्टअसे नाव असते. त्यातून त्याची सांघिक आणि ऐक्यभावना किती दृढ आहे हे दिसून येते.

**कौटुंबिक आणि नातेसंबंध:**

आदिवासी समाजात सामाजिकसंबंध प्राथमिक कौटुंबिक आणि नातेसंबंधांवर आधारित आहे या समाजाचे स्वरूप साधे आहे याखेरीज, या समाजात सामाजिक स्तरीकरण देखीलदिसत नाही. समाजप्रती सहकार्याची व समाजसेवेची भावना आजही त्यांच्यात दिसून येते .सगळे जण गुण्यागोविंदाने एकत्र राहत असल्याचे दिसून येते .एखाद्या कुटुंबावरती संकट आले तर सगळेलोक एकत्र येऊन त्या कुटुंबाला मदत करतात .आदिवासी समाजात अनेक चालीरीती ,रूढी, परंपरा ,व धार्मिक संस्कार हे वेगवेगळे आहेत . आदिवासी समाज बहुतेक वेळा नातेसंबंधांच्या भोवताली असताना दिसते यामध्ये त्यांच्या असणाऱ्या सामाजिक भूमिका, जबाबदाऱ्या आणि वैवाहिक युती ठरवणारी संयुक्त कुटुंबे किंवा कुळांचा समावेश खूप मोठ्या प्रमाणात असते आदिवासी लोक त्यांच्या जमातीबाहेर विवाह करत नाहीत.त्यांच्या असणाऱ्या जमातीमध्ये अंतर्गत विवाह करणे ही रूढ चाल आहे.त्या जमातींतील विवाह जमातींच्या अंतर्विवाह नियमांनुसार होतात. विवाह हा एक करार मानला जातो आणि घटस्फोट किंवा पुनर्विवाह करता येत नाही आता मात्र, गतिशीलतेमुळे या परिस्थितीमध्ये बदल होऊन बाह्य विवाह देखील होतात. त्यांचे धार्मिक कार्य हि वेगळे आहेत जंगल आणि त्यावरती अवलंबून असताना त्या जंगल ‘आदिवासी जमातीत सामाजिक संरचना समतावादी तत्त्वांवर आधारित असते. आदिम समाजात जातीव्यवस्था किंवा लिंग आधारित विषमता आढळून येत नाहीत. तथापि, काही जमातींमध्ये जमात प्रमुखाला वरचे सामाजिक स्थान असते किंवा त्याला अधिक अधिकार असतात.

**धर्मावरची श्रद्धा:**

धर्माच्या द्वारे मानव सतत आपल्या भोवतालच्या परिस्थितीवर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करीत आला आहे. मानवी व्यवहारात लक्ष घालून हस्तक्षेप करणारे देव, दानव, भूतात्मे, मृतात्मे व आत्मे इत्यादींचे जग असते, असा सर्व आदिवासींचा समज आहे. त्या जगाशी संबंध ठेवणारे विशिष्ट अधिकारी असतात. त्यांस पुरोहित, जादूगार, मांत्रिक, चेटकीण, देवऋषी इ. नावे आहेत. सर्व ब्रह्मांड एक किंवा अनेक विलक्षण व अतिमानवी शक्तींनी व्यापलेले आहे, अशी बहुतेक सर्व आदिवासी जमातींची श्रद्धा असते. त्या शक्ती मानवात, निसर्गात, देवदानवांतही असतात. त्यांचे धार्मिक कार्य हि वेगळे आहेत जंगल आणि त्यावरती अवलंबून असताना ते पूर्वज म्हणून जंगल किंवा वृक्ष किंवा प्राणी, नदी, झरे, सूर्य, चंद्र, यावरती त्यांची खूप श्रद्धा असते .हे त्यांचे धर्म प्रकार आहेत तसेच पवित्र वने हा त्या समाजाचा अविभाज्य भाग आहे. काळी आणि पांढरी जादू, पूर्वजांचे पूजन, हितकारक आणि अपायकारक शक्ती यावर त्या समाजाचा खूप विश्वास आहे. जडीबुटी, देवतांनी स्पर्श केलेल्या वस्तू, विशिष्ट ठिकाणची माती व पाणी, विशिष्ट पक्ष्याचे पंख इत्यादींना फार महत्त्व असते. प्रत्येक जमातीत जादुटोणा करणाऱ्या विशिष्ट व्यक्ती असतात. हेच

मांत्रिक रोगाचे निदान करतात व मंत्रसामर्थ्याने आणि जडीबुटी देऊन रोग बरे करतात. बऱ्याच जमातींत कौल लावण्याकरिता सुपात धान्य घेऊन मंत्र म्हणतात व त्यांचे छोटे छोटे ढीग रचून त्यांतील दाणे मोजण्यात येतात; बाधेचे निराकरण करण्यास बहुधा कोंबड्यांचा बळी देण्यात येतो. वाघापासून जास्त त्रास झाल्यास मंतरलेले दगड वेशीजवळ टांगण्यात येतात. गावात रोग फैलावल्यास मंत्रसामर्थ्याने त्या रोगास वाजतगाजत गावाच्या बाहेर हाकलण्यात येते. एकंदरीत आदिवासी जमातींत धर्मसंस्थेच्या द्वारा मानवाचा अतिमानवी व नैसर्गिक जगांशी संबंध प्रस्थापित होतो. धर्मामुळे सामाजिक मूल्यांचे जतन होते. आदिवासी संस्कृतीत लिखित ज्ञानाचा अभाव असल्याने, धार्मिक विधी व समारंभ यांच्या द्वारा ज्ञानाचे जतन होते व ते एका पिढीतून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होते. धार्मिक समारंभ व खेळ यांच्या द्वारे आदिवासी संस्कृतीच्या विविध अंगांचा आविष्कार होतो. शिकारी जमातींत नृत्याद्वारे प्राण्यांचे अंगविक्षेप व शिकारीचे तंत्र दाखविण्यात येते.

**कला:**

भारतातील आदिवासींची कला बहुरंगी आहे. घरावरील नक्षाकाम, स्मशानातील कोरीव खांब, समारंभप्रसंगीचे पोषाख, आभूषणे, मुखवटे, देवदेवतांच्या आकृत्या इ. प्रकारांत आदिवासींची कलादृष्टी दिसून येते. नागा जमातीचे पोषाख, मिझोंच्या टोप्या, टोपल्या, वाद्ये, मासे पकडण्याची जाळी इत्यादींतील रंगसंगती, तसेच कोरीवकाम व नक्षीकाम कलात्मक असते. साजशृंगाराची आदिवासींना आवड असते. अंगावर गोंदवून घेणे, समारंभप्रसंगी शरीरास रंग लावणे, केशभूषा करणे, गळ्यात रंगीबेरंगी माळा घालणे हे प्रकार सर्व जमातींत आढळतात. कपड्यांचा वापर फारच अल्प करण्यात येतो. माळा चकचकीत दगडांच्याही बनविण्यात येतात. नागालँड व मणिपुरमध्ये कपडे जमातीतच विणतात. बोंडो जमातीत झाडाच्या सालीपासून कपडे तयार करतात. गदाबा लोक वाघाच्या कातडीसारखे पट्ट्यापट्ट्यांचे कपडे विणतात. कोंड जमातीत केळीची पाने कमरेभोवती गुंडाळतात.

आदिवासींच्या दागिन्यांत कवड्यांचा सर्वांत जास्त उपयोग करण्यात येतो. आदिवासी स्त्रिया वेणीवर कवड्यांचा गजरा घालतात, जाकिटासाठी व पिशव्यांसाठी कवड्यांचा वापर करतात. कवड्यांबद्दल बरीच मते आहेत. तर काही तिला केवल अलंकार मानतात. कवडी वापरल्याने दृष्ट लागत नाही, असा लमाणी, मुडिया, माडिया व जुआंग या जमातींचा समज आहे. बोंडो, गोंड व परधान जमातींमधील स्त्रियांही कवड्यांचा वापर दागिन्यांकरिता करतात.

**आदिवासी समाजातील शिक्षण पद्धती:**

कोणत्याही समाजाचा विकास होण्यासाठी शिक्षण हा मूळ आहे.अज्ञानाच्या अंधकारात बुडालेले, मागासलेपणाच्या भोव-यात सापडलेल्या आदिवासी जनतेपर्यंत ज्ञानाचा प्रकाश पोहोचविण्यासाठी शिक्षणाची गरज आहे

समाजासोबत सर्व घटकांचा विकास हा शिक्षणाने होत असतो. पण तरी हि आज आपण बगतो कि आदिवासी समजत निरक्षरता मोठ्या प्रमाणात दिसत आहे. त्या ठिकाणची असणारी परिस्थिती कारणीभूत आहे.हि समाजव्यवस्था जंगलात, दुर्गम दऱ्याखोऱ्यांत राहणारी असतात. त्या ठिकाणी असणाऱ्या जंगलात असणाऱ्या गोष्टीवरती त्यांचा गुजारा होत. त्यासाठी त्यांना घरातील लहान मुलानंपासून वृद्धां पर्यंत सर्वांची गरज असते. शाळेच्या वेळामध्ये आदिवासी शाळकरी मुले जंगलातील विविध वस्तू गोळा करणे (वनौषधी ,फळे अन्नसंकलन ,शिकार ,मासेमारी यासारख्या रोजीरोटी मिळवण्यात गुंतलेली असतात . त्या समुदायात मुलांना मदतीचा हात व पालकांना अर्थाजनासाठी मदत म्हणून बघण्याचा खूप मोठा दृष्टिकोन आहे. तसेच जर आपली मुले शाळेत गेली तर खूप जास्त वेळ शाळेत जातो त्या मुळेआपले अर्थाजन कमी होईल त्यामुळे पालक आपल्या मुलांना शाळेत पाठवण्यासाठी नाखूष असतात. शिवाय त्यांच्या वाड्यावस्त्या पासून शाळेचे अंतर खूप जास्त असते तसेच त्या आदिवासी समाजाचे आपली एक बोली भाषा असते त्या बोली भाषे मध्ये शिक्षण व अभ्यासक्रम उपलब्ध नसल्या मुळे त्यामुळे मुलांना शिक्षणाची रुची निर्माण होत नाही व तो समाज शिक्षण पासून दूर असलेले दिसून येते आहे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांमध्ये असणारा नेतृत्वगुणांचा अभाव, वाढणारी बेशिस्त, गैरहजेरीचे वाढते प्रमाण, अभ्यासाकडे दुर्लक्ष्य करण्याची प्रवृत्ती, वक्तशीरपणाचा अभाव, अनैतीकपणाचा स्वीकार आणि नेमून दिलेले काम पूर्ण करण्याची वृत्ती यांची कारणे शोधून त्यावरती उपाय काढून लक्ष्य केंद्रित केल्यास खरोखर त्यांच्या शिक्षणाचा व शाळांचा दर्जा हि बदलेल व त्या समाजाचा हि विकास होईल .

**आदिवासींचे आर्थिक जीवन:**

आदिवासी समाजाचा आर्थिक जीवन व्यवस्थित असेल तर त्याचा विकास होत असतो त्यासाठी शिक्षणाचा खूप मोठा वाटा आहे त्यांच्या मध्ये पैश्याचा जास्त वापर नाकारता वस्तुविनिमय पद्धतीचा वापर केला जातो त्याच बरोबर हा समुदाय जंगलामध्ये फळे व अन्न संकलन, पशुपालन, शिकार, वनऔषधी गोळा करणे मासेमारी, टोपल्या तयार करने, विणकाम करणे, खाणकाम व शेती हि स्थलांतरित असते तर अश्या प्रकारचे काम करून ते आपले आर्थिक जीवन जगत असतात. या समाजात असणारी पारंपरिक व्यवसाय त्यातून मिळणारे उत्पन्न हे खूप कमी असते व त्यांच्या जीवना आवश्यक गरजा हि पूर्ण होत नाहीत त्यामुळे आदिवासी समाजातील जास्ती जास्त कुटुंबे हि गरीब व दारिद्र्यामध्ये असलेली दिसतात. शिक्षण नसल्यामुळे कोणताही व्यवसाय किंवा नोकरी करता येत नाही व एखादा व्यवसाय सुरु करायचा म्हटले कि भांडवल असणे गरजेचं आहे ह्या सर्व गोष्टी मुले आदिवासी समाजातील तरुण मुले हि नक्षलवादी संघटनाकडे वळलेली दिसतात. पारंपरिक पद्धतीने केलेली शेती व त्यातुन मिळालेले उत्पन्न हे कमीअसल्या मुळे दैनंदिन गरजा भागवण्यासाठी

सावकार किंवा जमीनदार कडून कर्ज घेणे त्या कर्जफेडी साठी असलेली शेती गहाण ठेवणे व काही काही वेळा ते सावकर व जमीनदार त्यांची जमीन आपल्या नावा वरती करून घेतलेले दिसते त्या समाजाकडे असलेले मागासलेलेपण व अशिक्षितपणा यामुळे या लोकांना मोठ्या प्रमाणात फसवले जाते .

**निष्कर्ष:**

आदिवासींचे एकंदरीत सर्व बाजूनी अध्ययन केले असता असे दिसून येते कि या सांजची असणारी परिस्तिथी कशी आहे त्याचा विकास हा कश्या पद्धतीने होत आहे .इतर समाजा पेक्षा किती मागासलेपण गरिबी , चुकीच्या रूढी परंपरांना प्रोत्साहन दिल्या मुळे आदिवासी समाजात अंधश्रद्धा मोठ्या प्रमाणात दिसून येते .तसेच शिक्षणाच्या बाबतीत त्यांच्या समाजात जागरूकता नसल्या मुळे त्यांना अनेक आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागते. त्यांचे असणारे वेगळे पण व त्यांची संस्कृती ह्या आताच्या आधुनिक जगात हि त्यांनी खूप छान पद्धतीने त्याची जपणूक केली आहे .तसेच या आदिवासी समाजाला असणाऱ्या अडचणी वरती मार्ग काढून त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणणे गरजेचे आहे त्यासाठी समाजाने व सरकारने हि त्याच्या सुधारणेसाठी लक्ष्य घाले गरजेचं आहे.

**संदर्भ सूची**:

१. डॉ .प्रदीप आगलावे भारतीय समाज सररचनात्मक प्रश्न आणि सामाजिक समस्या, श्री साईनाथ प्रकाशन नागपूर
२. कऱ्हाडे बाबू (२००४) आदिवासी समाजाचे समाजशास्त्र,नागपूर मानवता सांस्कृतिक विकास व शोध केंद्र चामोर्शी हिंदू मुद्रणालय
३. डॉ. गारे गोविंद महाराष्ट्रातील आदिवासी जमाती कॉंटिनेनेंटल प्रकाशन, पुणे (२००९)
४. देवगावकर शैलजा : आदिवासी विश्व् टानंद प्रकाशन नागपूर (२००१)
५. महाराष्ट्र शासन आदिवासी विभाग माहिती पुस्तिका २०११-१२